# महिला शिक्षकांमध्ये संविधानात्मक आणि कायदेशीर अधिकारांच्या जाणीवेचा अभ्यास करणे

– डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक
कु. ज्योती लष्करी
संशोधक विद्यार्थी, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

**प्रस्तावना**

लोकांनी लोकानसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही.लोकशाही असलेल्या देशात भारतीय जनतेला भारतीय संविधानाने समान अधिकार दिले आहेत.भारताचे सविधान समता, बंधुता आणि न्याय, स्वातंत्र्य या पायावर उभं आहे.कायदयाने सर्व समान संरक्षणव अधिकार आहे. धर्म, वंश, जात, लिंग यावरुन सार्वजनिकस्थाने व जागा वापर करण्यास हक्क, भाषण, अभिव्यक्ती स्वातंत्र, शांततेने व विना शस्त्र एकत्र जमण्याचे हक्क कुठल्याही क्षेत्रात मुक्तपणे संचार करण्याचे हक्क, शोषणा विरुद्धाचा हक्क, ६ ते १४ वर्षातील मुलांना मोफत शिक्षणाचाहक्क स्त्रियाच्या प्रतिमेलाहानी पोहचविणाऱ्या प्रथा बंद करणे असे विविध हक्क भारतीय संविधानाने भारतीय सर्व नागरिकांना दिले आहे. अगदी त्याचा पद्धतीने भारतीय स्त्रियांच्या सबलीकरणाहेतू आणि त्यांचा सुरक्षेसाठी त्यांना विविध हक्क प्रदानकरण्यात आले आहे.

आजच्या आधूनिक युगात जग जरी पुढे जात असल तरीकाहिगोष्टी आहे त्या जागी आहेत. आज पृथ्वीतलावरं वातवरणात बदल झाला. संस्कृतीत बदल झाला मात्र स्त्रियांवरील अत्याचारचा भडीमार काहीकमी झाला नाही. स्त्रियाचे शोषण पूर्वी हीहोतहोते व आजही होत आहे. फक्त आत्याचाराचे स्वरुप बदलले आहे.मानवातील माणूसिक आज कमीहोत चालली आहे.समाजातील नितिमत्ता ही घसरत आहे. कौटुंबिक आत्याचार सध्या खुपच वाढला आहे. त्यासाठी स्त्रीयावर होणाऱ्या या निरनिराळया अत्याचारापासून व कौटुंबिक हिंसाचारापासून तिला संरक्षण व हक्क प्राप्त करुन देण्यासाठी आजपर्यंत काहीकायदे अस्तित्वात आहेत. हे कायदे अस्तित्वात असले तरी या कायदया विषयीची महिती शिक्षित महिलांना आहे का? ज्या देशाचे भवितव्य घडवितात अश्या महिला शिक्षकांना कायदयाविषयी किती माहिती आहे. याचा शोध घेण्याचा प्रयत्न सदर विषयात केला आहे. सदर कायदे भारतीय महिलांना देण्यात आले आहे. सदर पेपरमध्ये काही निवडक कायदया विषयी माहितील देण्यात आली आहे.

१. **महिला संरक्षण कायदा** – कौटुंबिक छळ प्रातिबंधक कायदास्त्रीला कौटुंबिक सामाजिक, आर्थिक व शारिरीक संरक्षण देतो. कायदा फक्त



पुरुषांविरुद्ध लागू होतो. यात अंतरिम आदेश देणे. नुकसान भारपाई देणे. संरक्षण अधिकाऱ्याची नियुक्ती करणे. भागीदारीच्या घरात राहण्याचा आधिकार, कायदेशीर व वैदयकीय मदत देण्याचीतरतूदही आहे.

२. **अश्लीलताविरोधी कायदा** – भारतीय दंडसंहितेच्या कलम २९२ ते २९४ मध्ये महिलांशी अश्लील वर्तन करणाऱ्यांना शिक्षा देण्याचीतरतूद आहे.त्याचप्रमाणे जाहिराती. पुस्तक, चित्र आदी माध्यमांतून विटंबना करणाऱ्या चित्र किंवा लेखनातून अश्लीलतासादरकरणाऱ्याविरोधी कायदा १९८७ नुसार वॉरण्टशिवाय अटककरण्याचा अधिकारही आहे.

३. **छेडछाड करणे गुन्हा** – स्त्रीची अब्रु लुटणे, हात धरणे, तिच्या वस्त्रांना हात घालणे अशा प्रकारे विनयभंग करणाऱ्यांना भारतीय दंडसंहिता ३४५ खाली शिक्षेचीतरतुद आहे. तसेच छेडछाड केल्याबद्दल भारतीय दंडसंहिता कलम ५०९ अंतर्गत पोलिसांत तक्रात दाखलकरता येते.

४. **मुलांवर हक्क** – एखादयास्त्रीचा घटस्फोट झाल्यास तिच्या पाच वर्षापर्यंतच्या मुलांनाती स्वत:जवळ ठेवू शकते.मात्र पाच वर्षाहून अधिक वयाच्या मुलांच्या बाबतीत कोर्टाचा निर्णयच बांधील असतो.

५. **लैगिंक गुन्हे** – लैंगिक गुन्हयांसंबंधात भारतीय दंडसंहिताकलम ३७५ व ३७६ अनुसारकडक शिक्षा देण्यात येतात. लैंगिक प्रकरणाची सुनावणी कोर्टाच्या बंद खोलीत होते.

६. **महिलांच्या अटकेसंबंधी कायदा** – महिलांना फक्त महिला पोलीससूर्यादयानंतर आणि सूर्यास्तापूर्वी अटक करू शकतात. कुटुंबाच्या सदस्यांच्या उपस्थितीत व योग्य कारण असेल तरच स्त्रीला पोलीस ठाण्यात चौकशीसाठी बोलावता येते. स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्येच ठेवता येते.

७. **विशाखा गाईड लाईन्स** – कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैगिंक छळ होऊ नये म्हणून विशाखा गाईड लाईन्सची अंमलबजावणी राज्यात सुरु आहे. यासाठी राज्यभर तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आली असून महिला, मुली आणि बालकांचा अवैध मानवी व्यापार रोखण्यासाठी 'राज्य कृतिदला'ची स्थापना करण्यात आली आहे.

शासन मुलीच्या व महिलांच्या सुरक्षेसाठी आणि विकासासाठी नेहमी योग्य वातावरण निर्माण करुन देण्यात तत्पर असते. व महिलांच्या विकासासाठी राज्यशासन देखील सातत्याने प्रयत्नशील आहे. समाजात महिलांना मानसन्मानाने व सुरक्षित जगता हा त्यामागील हेतू आहे.

भाग २ : समस्या विधान

**महिला शिक्षकांमध्ये संविधानात्मक आणि कायदेशीर अधिकारांचा जाणीवेचा अभ्यास करणे**

**उद्दिष्टे** – १) संविधानाने दिलेल्या अधिकारांचा शोध घेणे. २) महिलांच्या असलेल्या कायदेशीर माहितीचा शोध घेणे. ३) महिला शिक्षकांनमध्ये संविधानात्मक कायदेशीर जाणीवेचा शोध घेणे.

**गृहितक** – १) संविधानाने भारतीय नागरिकालाकाही अधिकार दिलेले आहे. २) महाराष्ट्र शासन व केंद्रीय शासनाने महिलांचाअधिकारा संदर्भात काही कायेदे केलेले आहेत.

**संशोधन प्रश्न** – १) भारतीय नागरिकांचे कायेदशीर अधिकार कोणते? २) महिलांसाठी शिक्षकांना संविधानात्मक अधिकारांसंदर्भात कितपत माहिती आहे? ३) महिलांच्या अधिकारांच्या संदर्भात झालेल्या कायदयाची माहिती आहे का? ४) ग्रामीण व शहरी महिलां शिक्षकांना महिलांच्या अधिकारांच्या संदर्भात तफावत जाणवते का?

**नमूना** – समस्येचा शोध घेण्यासाठी संभाव्यता नमून निवड प्रकारातील यादृच्छीकस्तरीय नमूना निवड पद्धतीचा वापर केला आहे.नदुरबार जिल्हयातील संपूण महिला शिक्षिका जनसंख्या म्हणून घेऊन त्यातील १०% शिक्षिका म्हणजे ११० महिला शिक्षकांची नमूना म्हणून निवड केली आहे.

**कार्यवाही** – भारतीय संविधानने कोणकोणते आधिकार व कायदेहे भारतीय नागरीकांना माहिलांना दिले आहे.याचा अभ्यास करण्यासाठी वेबसाईट व पुस्तकाचे वाचन केले.समस्याचा शोध घेण्यासाठी सर्व्हेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.माहिलांना संविधाना विषयक अधिकार आणि कायदया विषयी किती माहिती आहे.हे जाणून घेण्यासाठी १०० महिला शिक्षकांकडून प्रश्नावली भरुन घेतली. १० मूख्यध्यापिका यांची मूलाखत घेऊन उपराक्त प्रश्नांचा आधारे चर्चा केली आहे.

**साधने** – १०० माहिला शिक्षकासाठी प्रश्नावली व माहिला मुख्यध्यापिकासाठी मूलाखत तंत्र वापरले आहे.

**ग्रामीण व शहरी भागातील महिला शिक्षकांना संविधानात्मक अधिकार व कायदयाविषयी ज्ञान नाही**

१.) वरील तक्त्याचे निरीक्षणकेले असता सरासरी ७०% ग्रामाणि भागातील प्राथमिक, माध्यमिक उच्चप्राथमिक व महाविद्यालयीन स्तरावरील महिला शिक्षकांना सविधान विषय अधिकार व कायदे माहित नाही. २) ग्रामीण भागातील महिला शिक्षकांचातूलनेत शहरी भागातील महिला शिक्षकांना संविधानात



दिलेल्या कायदया विषयी महिती आहे असे दिंसते.मात्र एकत्रित सर्व महिला शिक्षकांचा विचार केलातर सविधानात्मक कायदे व अधिकारा विषयी ५०% महिला शिक्षकांनाकायदया विषयी माहिती नाही. ३) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा , राष्ट्रीय महिला आयोगकायदा व विशाखा गाईड लाईन्स बद्दल सरासरी ९०% ग्रामीण व शहरी भागातील सर्व स्तरावरील महिला शिक्षकांमध्ये एकसारखी स्थिती दिसून येते.म्हणजेच या कायदया विषयी महिला शिक्षकांना माहिती नाही. ४) वरील कायदे काही महिला शिक्षकांना माहिती असेलतरी त्या कायदयाचा अर्थ व प्रक्रिया नेमकीकशीहोते या बद्दल ज्ञाना नाही फक्तकाहीकायद्याची नावे माहिती आहे असे दिसते.

**मूलाखती वरून आलेले निष्कर्ष**

ग्रामीण भागातील व शहरी भागातील महिला मुख्यध्यापिकाना महिला विषयक सर्व कायदयांन पैकीत्यातीलकाही निवडक कायदया विषयी माहिती आहे जसेहुंडा प्रातिबंधक कायदा, समान वेतन, मुलांचा हक्क, कौटुंबिक अत्याचार आणि गर्भनिदान कायदा, बालविवाह कायदा हया कायदया वैतिरिक्त उरवरितकायदया विषयी माहिती नाही. असे दिसून येते. प्रातिसादकांचा मतेहेकायदेसुशिक्षित महिलांना माहिती जरी असले तरी हया कायदांचा आधार घेऊन निर्णय घेणेहे भारतीय संस्कृतीचा विरोधात गेल्यासारखेहोते असे त्यांना वाटते. भारतीय संविधानाने सर्व भारतीय नागरिकांना समान हक्क दिलेले असलेतरीसुद्धा महिलांवरील अत्याचारकमी झालेले नाहीत. उलट अत्याचाराच्या स्वरुपात आज बदल झाला आहे. आजही महिलांना एकट जगण्याचा अधिकारसमाजाने दिलेला नाही. आणि असा निणर्य जर एखादया महिलेने घेतला असेलतर अनेक प्रश्नांचा तिला समाना करावा लागतो. याला कोण जास्त कारणीभूत आहेतेसांगणेकठिणच.

**शिफारशी** – १) शालेय स्तरवरील सर्व विषयात महिला विषयक कायदयांचा समावेश करणे. २) उच्च शिक्षणात महिला विषयक कायदे व अधिकार यांचा अभ्यासक्रमात समावेश करणे. ३) महिलांशी संबंधित कायदयांचा प्रचार व प्रसारहोणे आवश्यक आहे. ४) शालेय स्तावरील सर्व महिला शिक्षकांकरिता वर्षातून किमान एकदाकार्यशाळा आयोजित करणे आवश्यक आहे.

**प्रश्न** – १) सुशिक्षित महिलांना महिलांशी संबंधित कायदया विषयी ज्ञान नाहीतर अशिक्षित महिलांना असेलका? २) महिलांशी संबधित कायदे असुनही महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण का वाढत चालले आहे?

**सारांश**

लैगिक समानता या विषयावर भारतात जर राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय स्तरावर



Scanned with CamScanner

सेमिनार व कार्यशाळाहोत असतीलतर नक्कीच आपल्या देशात आज ही स्त्रि-पुरुष समानता नसेलच. भारतीय महिलांवरील अत्याचारही न थांबणारी गोष्ट आहे. यावर स्वत:स्त्रिनेकाठोर पाऊल उचलणेगरजेचे आहे. मन मोठ करुन अत्याचार सहन करणे मग ते कौटुंबिक असोकी बाहेरचे यावरुन तीकमजोर आहे असे सिद्ध होते. मात्र तिचातील माणूसकि आजही जिवंत आहे याचा समाजाला विसर पडत चालला आहे. तसेच शिक्षित महिलांना महिलांशी संबंधित कायदे माहिती नाहीतर समाजात ज्या अशिक्षित महिला आहेत त्या महिला या कायदया विषयी पूर्णपणे अज्ञात असतील असे दिसते.


संदर्भसूची

१. महिलांचे हक्क व अधिकार महिला व बालविकास जागृती कार्यक्रम पुस्तिका २००१.

२. अर्चना मेढेकर-मराठे, 'महिलासंचे कायदे', साकेत प्रकाशन, औरंगाबाद.


85

81



## साहित्यातील समाजसुधारकांचा स्त्री विषयक विचार


– प्रा.डॉ. संजय गजधर महाले

महाराज ज.पो. वळवी कला, वाणिज्य व श्री.वि.कृ. कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय धडगाव, ता. अक्राणी, जि. नंदुरबार


### प्रस्तावना

महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या इतिहासात एकोणिसावे शतक हे विचारपर्व ठरले आहे. समाजामध्ये प्रचंड वैचारिक वादळे झाली. ब्रिटिशांचा संपर्क, त्यांच्या साहित्याचे परिशीलन, विचारातील उदारता, स्त्रियांविषयीचा समानतेचा उदार दृष्टिकोन या साऱ्यांनीच भारतीय जनजीवनांवर छाप पाडली. हे आपल्याला अपरिचित व आपल्या परंपरागत श्रद्धा-निष्ठांना हादरा देणारे जीवनाचे रूप पाहिल्यावर आपल्याच जीवनाकडे विचारवंत नव्या दृष्टीने पाहू लागले आणि या निमित्ताने आत्मपरीक्षण होऊन नव्या विचारांचे वारे वाहू लागले. या विचार मंथनातून अनेक प्रश्न उभे राहिले, उभे केले गेले; ज्यांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नात पुढील शतकही पार पडले आहे.

विशेषत्वाने विचारात घेण्यात आले ते स्त्रीजीवनाचे विविध पैलू. भारतीय स्त्रीचे जीवन ही काळोखातील दु:खयात्रा होती. तिचा आनंद काळवंडलेला व दु:ख अंधारलेले असे जीवन ती जगत होती. तिच्या जीवनातील सारी नाती कष्टाशीच जोडणारी होती. माजघर ते स्वयंपाकघर ही तिची कार्यक्षेत्र नव्हते, कष्टक्षेत्रे होती. अपार कष्ट! दिले ते ल्यायचे, मिळेल ते खायचे, बोलतील ते ऐकून घ्यायचे आणि निमूटपणे पडतील ते कष्ट करायचे! रोज घरातही ती दासोच-भोगदासी! तिथेही पतीच्या इच्छेने, पतीच्या इच्छेएवढेच, पतीच्या इच्छेप्रमाणेच पतीच्या उपभोगासाठी ती हजर असायची मोठाले वाडे असोत किंवा दोन खणांच्या खोलीतील संसार असोत, स्त्रीजीवनाची तऱ्हा हीच होती! समाजातील या उघड्या भळभळ वाहणाऱ्या जखमेकडे विचारवंतांचे लक्ष गेले आणि त्यांच्या लेखणीने जणू युद्धच पुकारले - प्रस्थापितांविरूद्ध, व्यवस्थेविरूद्ध!

### समाज सुधारकांचा स्त्री विषयक विचार

मृतवत जीवन जगणाऱ्या स्त्रीमध्ये प्रथम विचारांची प्रेरणा जागवली ती लोकहितवादींनी. स्त्रीला हीन जीवन जगायला भाग पाडणाऱ्या समाजाची त्यांनी निर्भर्त्सना केली. स्त्रीदास्य विमोचनाचे रणशिंग फुंकले. स्त्रीला सन्मानाने वागवा, हे तर त्यांनी देशबांधवांना सांगितलेच; पण स्त्री-पुरूष नात्यातील अनेक शक्यता त्यांनी वर्तवल्या. हे लोकहितवादींचे फार मोठे देणे आहे. आपल्या 'नादविद्या'